<u>नि.१४७ खाली आदेश</u>

१. प्रस्तुतचा अर्ज हा प्रतिवादी नं ४(२) ते ४(५) यांनी दि. ०३/०२/२०१६ रोजीचा विनाकैफियतचा हुकुम रद्द होउन कैफियत दाखल करणे कामी दिवाणी प्रक्रिया संहिता१९०८ चे आदेश ९ नियम ७ खाली दाखल केलेला आहे.

२. सदर अर्जावर वादी यांचे म्हणणे घेण्यात आले. सदर अर्जास वादी यांनी सदर अर्जावर प्रतिवादी नं ४(१) यांचीच सही असुन प्रतिवादी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण दिलेले नाही म्हणुन सदर अर्ज रदद करण्यात यावा अशी हरकत घेतली आहे.

३. प्रतिवादी ४(२) ते ४(५) यांनी त्यांचे अर्जात असे नमुद केले आहे की, वादी व इतर प्रतिवादी हे त्यांना सदर दावा लोकअदालतमध्ये तडजोड होणार असुन तुम्ही न्यायालयात यायची आवश्यकता नाही, तसेच तुम्हाला तुमचा हिस्सा मिळणार आहे असे सतत सांगितल्यामुळे प्रतिवादी हे न्यायालयात उपस्थित राहिले नाहीत व त्यांचे विधिज्ञाकडे गेले नाहीत. सदर प्रकरण हे लोकन्यायालयात ठेवण्यात आले होते. परंतु त्यामध्ये तडजोड झाली नाही. या कारणामुळे प्रतिवादी ४(२) ते ४(५) यांनी कैफियत दाखल करण्यास विलंब झालेला आहे. प्रतिवादी यांचे म्हणणे दाखल करुन न घेतल्यास त्यांचे अपरिमित नुकसान होणार आहे. त्यामुळे प्रतिवादींनी सदरचा अर्ज मंजुर करण्यात यावा अशी विनंती केली.

४. याठीकाणी हे ध्यानात घेणे गरजेचे आहे की, प्रतिवादी यांनी त्यांचे अर्जामध्ये विनाकैफियतचा आदेश दि.०३/०२/२०१६ रोजी पारित केला असल्याचे नमुद केले आहे. परंतु नि.क्र १ वरील आदेश व रोजनाम्याचे अवलोकन केले असता, प्रतिवादी नं ४ यांचे वारसांविरुध्द दि.०३/०२/२००६ रोजी विनाकैफियताचा आदेश पारित करण्यात आलेला आहे.

५. प्रस्तुत प्रतिवादींनी सदरचा अर्ज प्रतिज्ञापत्रासहित दाखल केलेला आहे. तसेच प्रतिवादी ४(२) ते ४(५) यांनी सदर दि.०३/०२/२०१६ रोजीचा विनाकैफियतचा हुकुम

रदद होण्यासाठी योग्य ते कारण व इतर परिस्थिती याबाबत अर्जात नमुद केले आहे. सदर अर्ज मंजुर केल्यास वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट प्रतिवादींनी त्यांचे म्हणणे न दाखल केल्यास त्यांचे नुकसान होणार आहे. वरिल सर्व परिस्थिती पाहता व न्यायाच्या हिताच्या दृष्टीने सदर अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. प्रतिवादींना त्यांचे म्हणणे दाखल करण्याकरिता बराच विलंब झालेला आहे, ज्यामुळे वादीची गैरसोय होत आहे. परंतु त्याची भरपाई प्रतिवादींवरती वाद खर्च लादुन करता येईल. ज्या अर्थी प्रस्तुतचा दावा हा वाटपाकरिता असल्याने न्यायाचे तत्व ध्यानात घेउन प्रतिवादींना त्यांचे म्हणणे दाखल करण्यास संधी देणे उचित होईल. उपरोक्त नमुद कारणमिमांसा व प्रतिवादी यांना कैफियत दाखल करण्याकरिता विलंब झालेला कालावधी ध्यानात घेउन खालील आदेश पारित करण्यात येतो.

<u>आदेश</u>

१. अर्ज (नि.१४७) खर्चासह मंजूर करण्यात आला.

२. प्रतिवादी ४(२) ते ४(५) यांचे विरुध्द झालेला विनाकैफियत आदेश रद्द करण्यात आला.

३. प्रतिवादी ४(२) ते ४(५) यांनी वादी यांना रु.१०००/- वाद खर्च दयावा.

HARSHADA UTTAM PATIL
Digitally signed by HARSHADA UTTAM PATIL
Date: 2022.02.23 16:30:04 +0530

(ह.उ.उ.पाटील)
सह दिवाणी न्यायाधीश, भोर
जि.पुणे.

दिनांक : १५/०२/२०२२

## Certificate

**"I affirm that the contents of this P.D.F file Order are same word for word as per original Order.**
**Name of the Steno : V.G.Fulari**
**Court Name : H.U.U. Patil**
**Jt. C.J.J.D., Bhor, Dist. Pune.**
**Date : 15/02/2022**
**Order signed by presiding officer on : 15/22/2022**
**Order uploaded on : 23/02/2022.**